## मोटार अपघात दावा अर्ज क्र.३३०/२०१६ मधील नि.६ खालील आदेश

अर्जदार यांनी नुकसान भरपाई मिळण्यासाठी मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १६६ नुसार केलेल्या मुख्य अर्जात, या अर्जाद्वारे त्या अधिनियमाखालील कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केलेली आहे.

२. अर्जदारांचे कथनानुसार दि.०९/०१/२०१६ रोजी सायंकाळी ०५.५० वा. चे सुमारास शिरवळ ते नायगांव मार्गावर सांगवी, ता. खंडाळा, जि. सातारा गांवचे हद्दीत मोहसीन चांद शेख हा हिरो होंडा मोटारसायकल क्र.एम्.एच्./११/ए.एफ-६१८६ वरून नायगांव बाजुकडुन शिरवळ बाजुकडे जात असताना, सामनेवाला क्र.१ यांचे मालकीची महिंद्रा जीप क्र.एम्.एच्./११/एफ-१६६८ ही त्याने निष्काळजीपणे भरधाव चालवून विरूध्द दिशेने येवून अचानक रस्त्यावर थांबवल्याने त्याची मोटारसायकल जीपला धडकली आणि त्या अपघातामध्ये तो गंभिररित्या जखमी होवून उपचारासाठी नेत असताना मयत झाला. अपघाताचे वेळी सदरची जीप सामनेवाला क्र.१ यांच्या मालकीची होती आणि या वाहनाचा विमा सामनेवाला क्र.२ दि न्यू इंडिया ॲशोरन्स कं. लि. या विमा कंपनीकडे उतरविलेला असल्याने, दोन्ही सामनेवाले नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत.

३. सामनेवाला क्र.१ यांनी नि.१८ प्रमाणे म्हणणे दिलेले आहे. सामनेवाला क्र.२ यांनी म्हणणे दिलेले नाही.

४. अर्जदारांनी यादी (नि.४) सोबत हजर केलेले अपघाता संबंधीचे शिरवळ पोलीस स्टेशन मधील दि.१३/०१/२०१६ रोजी नोंदविलेल्या गु.र.नं.१०/२०१६ मधील प्रथम वर्दी अहवाल, घटनास्थळ पंचनामा यावरून अर्जदारांच्या कथनाप्रमाणे वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्याचे आणि सदरहू वाहने त्या अपघातात सामील असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

५. अर्जदार यांनी हजर केलेल्या विमा प्रमाणपत्राची प्रत सकृतदर्शनी असे दर्शविते की, महिंद्रा जीप क्र.एम्.एच्./११/एफ-१६६८ चा सामनेवाला क्र.२ यांचेकडे सामनेवाला क्र.१ यांनी मालक या नात्याने दिनांक १८/०५/२०१५ ते १७/०५/२०१६ या कालावधीसाठी विमा उतरविलेला होता आणि अपघाताचे दिवशी सदरहू वाहन सामनेवाले क्र.२

यांच्याकडे विमा संरक्षित होते.

६. अर्जदार यांनी हजर केलेले शव विच्छेदन अहवाल व प्रेताचा पंचनामा यावरुन असे स्पष्ट होते की, मोहसीन चांद शेख याचा अपघातामध्ये गंभीर जखमी झाल्यामुळे मृत्यू झालेला आहे. वरील सर्व परिस्थितीत अर्जदार हे कलम १४० अन्वये अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत आणि सामनेवाला क्र.१ व २ हे स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या सदर नुकसान भरपाई देण्यास जबाबदार आहेत. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे:

**: आ दे श :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवाला क्र.१ व २ यांनी स्वतंत्र आणि संयुक्तिकरित्या नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.५०,०००/-(रू. पन्नास हजार फक्त) या आदेशापासून ३० दिवसाचे आत अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी रू.२५,०००/- (रू.पंचविस हजार फक्त) प्रमाणे स्वतंत्र रेखांकित धनादेशाने द्यावी. सदरहू रक्कम मुदतीत न दिल्यास त्यावर अर्ज दाखल तारखेपासुन संपूर्ण रक्कम फिटेपर्यंत द.सा.द.शे. ७.५ टक्के दराने व्याज देण्यास सामनेवाला क्र.१ व २ जबाबदार राहतील.

३. येणेप्रमाणे अंतरिम निवाडा करण्यात यावा.

सातारा.
दिनांक:१५/१२/२०१६

(बी. यू. देबडवार)
अध्यक्ष, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण
सातारा.